## जिल्हा निवड समिती, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,चिमूर व चंद्रपूर

### पदभरतीची जाहिरात

### कंत्राटी क्रिडा शिक्षक/मार्गदर्शक (११महिन्यांच्या कराराने)भरावयाच्या पदभरतीची जाहिरात

---

महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शा.नि.क्र.शाआशा—२०१८/प्र.क्र.८४/का.१३,दिनांक ६ मार्च, २०१८ अन्वये आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील शासकिय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या प्राविण्यानुसार, विविध खेळांचे प्रशिक्षण/ मार्गदर्शन देवुन त्यांच्यातील कलागुणांचा विकास करण्याकरीता, तसेच त्यांना खेळामधील बदललेल्या आधुनिक तंत्रज्ञानानुसार योग्य खेळाची ओळख, खेळांची शास्त्रोक्त माहिती इत्यादी उपलब्ध करून देण्याकरीता क्रीडा शिक्षक/क्रिडा मार्गदर्शकाची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यास मान्यता आहे. त्या अनुषगाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर व चंद्रपूर यांचे अधिनिस्त शासकीय आश्रमशाळेसाठी **'कंत्राटी क्रिडा शिक्षक/ मार्गदर्शक'**या पदाकरीता अर्हताधारक पात्र उमेदवाराकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज भरण्याची मुदत जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून **अंतिम दिनांक १० जून २०१८ पर्यंत राहील.**

पदांची संख्या खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदाचे नाव | चिमुर प्रकल्प | | चंद्रपूर प्रकल्प | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष | महिला | पुरूष | महिला | |
| १ | कंत्राटी क्रिडा शिक्षक/ मार्गदर्शक | २ | १ | ४ | १ | ८ |

शैक्षणिक अर्हता/अनुभव ( अर्ज करतेवेळी उमेदवाराने सदर अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे)

| अ.क्र. | पदाचे नाव व वेतन | आवश्यक शैक्षणिक अर्हता | |
|---|---|---|---|
| १ | कंत्राटी क्रिडा शिक्षक/ मार्गदर्शक ११ महिण्याच्या कंत्राटी पध्दतीवर दरमहा एकत्रित वेतन रू. २५०००/—(अक्षरी रूपये पंचविस हजार मात्र ) | नामवंत खेळाडू, माजी सैनिक, स्वेच्छा सेवानिवृत्त पोलीस अधिकारी /कर्मचारी यांचेसाठी . | उमेदवार कोणत्याही मैदानी खेळाचे किमान विद्यापीठ स्तरावर प्रतिनिधीत्व केलेले असावा. |
| | | नामवंत खेळाडू, माजी सैनिक, स्वेच्छा सेवानिवृत्त पोलीस अधिकारी /कर्मचारी यांचे **व्यतिरीक्त असलेल्या उमेदवारासाठी**. | विशेष क्रिडा अर्हता (एन.आय. एस./बी.पी.एड/एम.पी.एड.) **किंवा** कोणत्याही मैदानी खेळाचे किमान विद्यापीठ स्तरावर / राज्यस्तरावर /राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधीत्व केलेले असावा. |

अर्ज करण्याची पध्दत —

१. या जाहिरातीतील दिलेल्या विहित नमुन्यात ए—४ आकाराच्या कागदावर भरलेला अर्ज स्विकारण्यात येईल.
२. उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज शैक्षणिक व अन्य प्रमाणपत्राच्या स्व—प्रमाणित स्पष्ट सत्यप्रती (झेराक्स )जोडून **मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प,चंद्रपूर, पहिला मजला, प्रशासकिय भवन , जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, चंद्रपूर येथे दिनांक १० जून, २०१८ पूर्वी पोहचतील या बेताने सादर करावे.**
३. प्राप्त अर्जाची गुणवत्ता व पात्रतेनुसार अर्जाची छाननी करून उमेदवारास १:५ याप्रमाणे प्रत्यक्ष मुलाखतीस बोलाविण्यात येईल.

सर्वसाधारण सुचना —

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.( अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक
२. उमेदवार हा किमान विद्यापीठ स्तरावर कोणत्याही मैदानी खेळामध्ये आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये विद्यापीठाकडून प्रतिनिधीत्व केलेला असावा.
३. अधिकृत राज्यसंघटना किंवा भारतीय खेळ प्राधिकरण व्दारा आयोजित स्पर्धेत भाग घेवुन प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडूचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येवुन अत्युच्च गुणवत्ताधारकास प्राधान्य देण्यात येईल.
४. अर्जदार हा शारिरीकदृष्टया तंदुरूस्त असणे आवश्यक आहे. याबाबत वैद्यकीय अधिका—याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

५. अर्जदार  ज्या क्षेत्रातील निवासी असेल त्या क्षेत्रातील पोलीस स्टेशनमधुन चारित्र्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.
६. अर्जदाराने सादर केलेली क्रिडाविषयक प्रमाणपत्रे क्रिडा विभागाकडून तपासणी करून अवैध ठरल्यास उमेदवाराची नेमणुक रद्द करण्यात येईल.
७. क्रिडा शिक्षक/क्रिडा मार्गदर्शकास आश्रमशाळेच्या शालेय वेळेपूर्वी शारिरीक शिक्षण/व्यायामाचे प्रशिक्षण तसेच शालेय वेळेनंतर विविध खेळांचे प्रशिक्षण द्यावयाचे आहे. याकरीता आश्रमशाळा परिसरात **वास्तव्याने** राहावे लागेल.
८. सदर निवड ही अत्यंत तात्पुरत्या स्वरूपाची असून नियमित सेवेकरीता कोणतीही मागणी/विनंती मान्य केल्या जाणार नाही.
९. उमेदवारास रू. १००/— चे स्टॅम्प पेपरवर शासन निर्णयातील करारनामा (विवरणपत्र—अ) लिहून देणे बंधनकारक राहील.
१०. सदर भरती प्रक्रीयेसंदर्भात जिल्हा निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.
११. जाहिरातीतील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील.

विशेष सुचना—

सदर पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक व इतर अनुषंगीक पात्रता धारण केलेली असेल अशाच उमेदवारांनी अर्ज सादर करावेत. आवश्यक पात्रता पुर्ण न करणा—या उमेदवारांनी अर्ज करू नये.

**टिपः— निवड प्रक्रिया स्थगीत करणे किंवा रद्द करणे, पदाच्या एकुण संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच निवड प्रक्रिया संदर्भात वाद तक्रारी बाबत अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, चंद्रपूर हे स्वतःकडे राखून ठेवत आहे. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही अथवा दाद मागता येणार नाही.**

# ‘कंत्राटी क्रिडा शिक्षक/मार्गदर्शक’ या पदासाठी अर्जाचा नमुना

| अर्जदाराचा<br>अलिकडेच<br>काढलेला<br>पासपोर्ट<br>साईझ<br>रंगीतफोटो |
|---|

प्रति,

मा. प्रकल्प अधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती
तथा एका. आदिवासी विकास प्रकल्प,
चिमूर/चंद्रपूर.

१)अर्जदाराचे संपूर्ण नाव:————————————————————————————

२)पतीचे/वडीलाचे संपूर्ण नाव:—————————————————————————

३)आधार क्रमांक:—————————————————————

४)जन्म दिनांक (अंकात): ——/——/———————  वय: ———वर्षे————महिने.

५)जन्म दिनांक (अक्षरी): ———————————————————————————

६)मातृभाषा: ————————————

७)मोबाईल क्र.——————————

८)अर्जदाराचे संपूर्ण पत्ता (कायम):————————————————————————

————————————पिनकोड ———————————

९) अर्जदाराचे पत्रव्यवहाराचा पत्ता:———————————————————————

———————————— पिनकोड ———————————

१०) अर्जदार हा नामवंत खेळाडू/माजी सैनिक/स्वेच्छा सेवानिवृत्त पोलीस अधिकारी आहे/नाही.

११) शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता:

| अ.क्र. | पदवी/पदव्युत्तर पदवी | विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त श्रेणी/टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

१२) विशेष प्राविण्य/प्रतिनिधित्व :

| अ. क्र. | खेळप्रकार | प्राविण्य/प्रतिनिधित्व | विद्यापीठस्तर/राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर | उल्लेखनिय बाब |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

**टिप:** वरील अ.क्र. ११ व १२ मधील नमूद पात्रता/प्रमाणपत्राच्या स्वप्रमाणित सत्यप्रती (स्पष्ट) या अर्जासोबत जोडण्यात याव्या.

अर्जासोबत जोडलेली **संपुर्ण** कागदपत्रे:

१.

२.

३.

प्रमाणित करण्यात येते की, मी वरीलप्रमाणे दिलेली माहिती व शैक्षणिक अर्हता/प्रमाणपत्रे सत्य असून प्रत्यक्ष मुलाखतीस खोटे किंवा बनावट आढळल्यास माझी उमेदवारी रद्द करून मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

ठिकाण:

दिनांक: अर्जदाराची सही

अर्जदाराचे संपूर्ण नाव